ISSN 2231-573X
UGC Care Listed Journal

# तिफण

वर्ष : १२ वे । अंक २ रा
जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर - २०२१



## लोककवी वामनदादा कर्डक विशेषांक

साहित्य, कला आणि लोकसंस्कृतीला वाहिलेले त्रैमासिक

# तिफण

वर्ष १२ वे, अंक – दुसरा: जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर २०२१

UGC Care Listed Journal
ISSN 2231 - 573X

• संपादक •

डॉ. शिवाजी हुसे

पत्ता : संपादक, तिफण, 'शिवार', श्रीराम कॉलनी,
हिवरखेडा रोड, कन्नड, जि. औरंगाबाद – ४३११०३.
मो. ९९०४००३९९८

UGC Care Listed Journal ISSN 2231 - 573X

साहित्य, कला आणि लोकसंस्कृतीला वाहिलेले त्रैमासिक

# तिफण

MAH MAR 34737/13/1/2009-TC

## लोककवी वामनदादा कर्डक विशेषांक (भाग-४)

वर्ष १२ वे, अंक – दुसरा: जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर २०२१

● संपादक ●

डॉ. शिवाजी हुसे

● अतिथी संपादक ●

डॉ. युवराज धबडगे, मराठी विभागप्रमुख

प्रा. नागेश वोन्तेवाड, मराठी विभाग

दगडोजीराव देशमुख महाविद्यालय, वाळूज, जि. औरंगाबाद

● संपादक मंडळ ●

डॉ. सर्जेराव जिगे

डॉ. फुला बागूल

डॉ. अनिल गर्जे

डॉ. संजय सांभाळकर

डॉ. ताहेर पठाण

डॉ. वंदना महाजन

डॉ. रामचंद्र झाडे

डॉ. ममता इंगोले

डॉ. वामन जाधव

डॉ. यशवंत सोनुने

मूल्य : ३५० रुपये

या अंकातील लेखकांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. या नियतकालिकास महाराष्ट्र रा
साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून अनुदान प्राप्त झाले आहे. परंतु या नियतकालिकात प्रसिद्ध झालेले म
मंडळास मान्य असतीलच असे नाही.

पत्ता : संपादक, तिफण, 'शिवार', श्रीराम कॉलनी, हिवरखेडा रोड, कन्नड.
जि. औरंगाबाद – ४३११०३. मो. ९९०४००३९९८

# संपादकीय...

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचार, कार्य व तत्त्वज्ञानाचा स्वीकार करून आपल्या वाणी व लेखणीतून आंबेडकरी विचार समाजात पेरणारे, आंबेडकरी जाणिवेचे, महाकवीची प्रतिभा लाभलेले आणि अतिशय ताकदीने लेखन करून आपली गीतरचना सादर करणारे महाकवी वामनदादा कर्डक यांचे हे जन्मशताब्दी वर्ष आहे. वामनदादा कर्डक यांनी अतिशय ताकदीने लेखन करून सर्वसामान्य जनांच्या समाजमनात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचे स्फुल्लिंग प्रज्वलित करून त्यांचा विचार गावागावांत, वाड्यावस्त्यावर पोहोचविण्याचे महनीय कार्य वामनदादा कर्डक यांनी केले आहे. त्यांच्या जीवन आणि कार्याला कृतिशील अभिवादन करण्यासाठी विजय शिक्षण प्रसारक मंडळ संचलित दगडोजीराव देशमुख महाविद्यालयाचा मराठी भाषा व वाङ्मय विभाग; भाषा, साहित्य, संस्कृती आणि संशोधन परिषद औरंगाबाद आणि त्रैमासिक 'तिफण' यांच्या संयुक्त विद्यमाने एकदिवशीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आलेले आहे. या चर्चासत्रासाठी महाराष्ट्र आणि महाराष्ट्राबाहेरील राज्यांतील प्राध्यापक, संशोधक विद्यार्थ्यांनी आपले शोधनिबंध पाठविलेले आहेत. मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृतीला वाहिलेल्या त्रैमासिक 'तिफण' या दर्जेदार नियतकालिकातून हे सर्व शोधनिबंध प्रकाशित होत आहेत याचा मनस्वी आनंद आहे. लोककवी वामनदादा कर्डक हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीचे निष्ठावान पाईक आणि समाजाच्या हृदयावर विराजमान झालेले व्यक्तिमत्त्व. वामनदादांनी केलेली गीतरचना डॉ. बाबासाहेबांच्या विचारांची सर्वसामान्य माणसाच्या आशा-आकांक्षांची ज्योत सततेवत ठेवण्याची जिद्द बाळगून साकार झालेली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय, आणि सांस्कृतिक कार्याचा महान विचार आपल्या लेखणीद्वारे बुलंद आणि पहाडी आवाजात गाऊन महाराष्ट्र, महाराष्ट्राच्या बाहेरील शहरे, खेडी, वाड्यावस्त्यांपर्यंत नेऊन पोहोचविण्याचे महान कार्य शेवटच्या श्वासापर्यंत अविरत केले आहे.

लोककवी वामनदादा कर्डक यांच्या बाबतीत असे एक वचन आहे की, 'असे एकही गाव नाही जिथे वामनचे नाव नाही'. पुढे असे म्हणता येईल की, 'असा एकही विषय नाही ज्याला वामनच्या लेखणीने स्पर्श केला नाही.' वामनदादांनी संपूर्ण बुद्ध तत्त्वज्ञानाबरोबरच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनातील जन्मापासून ते मृत्युपर्यंतच्या सर्वच्या सर्व घटना काव्यबद्ध केलेल्या आहेत. आंबेडकरी गीते, बौद्धगीते, गझल, लोकगीते, समाजप्रबोधनपर गीते, राष्ट्रीय गीते, राष्ट्रीय स्तरावरील अनेक घटनाप्रसंगांना एकही दिवस शाळेत न जाणाऱ्या वामनदादांनी आपल्या उत्तुंग प्रतिभेच्या जोरावर शब्दबद्ध केले आहेम्हणून या कृतिशील प्रतिभावंताला या चर्चासत्राच्या निमित्ताने विनम्र अभिवादन!

- संपादक

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | शीर्षक / लेखक-संशोधक | पृ. क्र. |
|---|---|---|
| 1. | वामनदादा कर्डक यांच्या गीतातील शैक्षणिक जाणिवा<br>- प्रा. नागेश बोंतेवाड | 1 - 4 |
| 2. | वामनदादा कर्डक : आंबेडकरी गीतकार<br>- प्रा. विजयश्री विठ्ठल गवळी | 5 - 8 |
| 3. | डॉ. बाबासाहेबांचे बुद्धत्व विशद करणारी वामनदादांची कविता<br>- प्रा. डॉ. विश्वजित कांबळे | 9 - 15 |
| 4. | वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील शैक्षणिक तत्त्वज्ञान<br>- डॉ. मारोती गायकवाड | 16 - 23 |
| 5. | लोककवी वामनदादा कर्डक यांच्या गीतातील स्त्री-जाणिवा<br>- प्रा. डॉ. रामकिशन दहिफळे | 24 - 26 |
| 6. | लोककवी वामनदादा कर्डक यांच्या गीतातील आंबेडकर दर्शन<br>- डॉ. संतोष देशमुख | 27 - 31 |
| 7. | लोककवी वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील आंबेडकरी तत्वज्ञान (शैक्षणिक)<br>- प्रा. कातकडे केशव श्रीरंग / प्रा.डॉ. रमाकांत का. गजलवार | 32 - 36 |
| 8. | आंबेडकरी ऊर्जा पुरवणारे समर्थ लोककवी वामनदादा कर्डक<br>- प्रा. डॉ. दादाराव गुंडरे | 37 - 41 |
| 9. | लोककवी वामनदादा कर्डक यांचे गीतलेखन व डॉ. बाबासाहेब आंबेडकर<br>- मंगल कचरु सांगळे | 42 - 47 |
| 10. | वामनदादा कर्डक यांच्या गीतातून प्रकट झालेले आंबेडकरी विचार<br>- प्रा. डॉ. लालबा दुमटकर | 48 - 50 |
| 11. | वामनदादा कर्डकांचे काव्य : आंबेडकरी विचार चळवळीची शिदोरी<br>- प्रा. कैलाश माणिकराव मुटकुळे | 51 - 54 |
| 12. | 'माझ्या जीवनाचं गाणं' : एका लोककलावंताचा जीवन संघर्ष<br>- प्रा. डॉ. आनंद वारके | 55 - 59 |
| 13. | वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील आंबेडकरी तत्त्वज्ञान<br>- डॉ. महालक्ष्मी मोराळे | 60 - 65 |

| | | |
|---|---|---|
| 14. | लोककवी वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील बुद्ध तत्वज्ञान<br>- श्री. विजयकुमार बुद्धप्पा झुंबे | 66 - 69 |
| 15. | लोककवी वामनदादा कर्डक यांचा कवितेतील भीमदर्शन<br>- प्रा. डॉ. हनुमंत लक्ष्मण भवारी | 70 - 74 |
| 16. | वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील क्रांतिकारकता<br>- डॉ. सागर गवई | 75 - 77 |
| 17. | लोककवी वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील आंबेडकरी तत्वज्ञान<br>- डॉ. वर्षा दिगंबर गायकवाड | 78 - 82 |
| 18. | महाराष्ट्राच्या समाजप्रबोधनाचे गीतकार<br>- प्रा. डॉ. प्रविण वसंतराव चव्हाण | 83 - 85 |
| 19. | लोककवी वामनदादा कर्डक यांची लोकगीते<br>- डॉ. जितेंद्र शामसिंग गिरासे | 86 - 89 |
| 20. | आंबेडकरी चळवळीतील समाजप्रबोधक : वामनदादा कर्डक<br>- श्री. धनंजय वसंत भाट | 90 - 93 |
| 21. | लोककवी वामनदादा कर्डक : व्यक्ती आणि कार्य<br>- डॉ. देवयानी चव्हाण | 94 - 97 |
| 22. | लोककवी वामनदादा कर्डक यांच्या गीतांतील सामाजिकता<br>- विद्या कुलकर्णी | 98 - 103 |
| 23. | लोककवी वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील आंबेडकरी तत्वज्ञान<br>- प्रा. राजा जगताप | 104 - 107 |
| 24. | लोककवी वामनदादा कर्डक यांची गझल रचना<br>- प्रा. डॉ. सुनील गणपत धनकुटे | 108 - 111 |
| 25. | लोककवी वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील सामाजिक विचार<br>- प्रा. केशव विठ्ठल कोकाटे | 112 - 113 |
| 26. | लोककवी वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील आंबेडकरी तत्वज्ञान<br>- शीला विठ्ठलराव डोंगरे | 114 - 117 |
| 27. | वामनदादा कर्डक यांच्या गीतातील स्त्री<br>- डॉ. कैलास सोनू महाले | 118 - 121 |
| 28. | मानवतेची हाक देणारा कवी : वामनदादा कर्डक<br>- प्रा. डॉ. व्यंकटी पावडे | 122 - 125 |

| | | |
|---|---|---|
| 29. | आंबेडकरी चळवळीत वामनदादा कर्डक यांचे योगदान<br>- प्रा. डॉ. किशोर शेषराव चौरे | 126 - 129 |
| 30. | वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील परिवर्तनवादी विचार<br>- डॉ. नंदकुमार माने | 130 - 132 |
| 31. | महाकवी - वामनदादा कर्डक आणि कार्य<br>- प्रा. डॉ. राहुल यशवंतराव निकम / प्रा.डॉ.मारोती निवृत्ती गायकवाड | 133 - 137 |
| 32. | बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची पेरणी करणारा महाकवी वामनदादा कर्डक<br>- प्रा. डॉ. उत्तम जकोजी सोनकांबळे | 138 - 142 |
| 33. | वर्ग लढ्याची जाणीव देणारे महाकवी वामनदादा<br>- डॉ. समाधान इंगळे | 143 - 146 |
| 34. | वामनदादा कर्डक यांची आंबेडकरी गीते<br>- डॉ. रामलीला सुदामराव पवार | 147 - 152 |
| 35. | लोककवी वामनदादा कर्डक यांच्या लोकगीतातील सामाजिकता<br>- डॉ. यशवंत सोनुने | 153 - 155 |
| 36. | प्रतिभावंत लोककवी शाहीर वामन (दादा) कर्डक<br>- प्रा. डॉ. दीपक सुभाषराव सूर्यवंशी | 156 - 159 |
| 37. | वामनदादा कर्डक - व्यक्ती आणि वाङ्मय<br>- प्रा.डॉ. बाबासाहेब पिरगोंडा नाईक | 160 - 162 |
| 38. | महाकवी वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील आंबेडकरवाद<br>- प्रा. डॉ. शिवदास कान्हुजी इंदोरकर | 163 - 168 |
| 39. | लोककवी वामनदादा कर्डक : व्यक्ती आणि वाङ्मयातील काव्याचे स्वरूप<br>- प्रा. सिद्धार्थ इंगोले | 169 – 172 |
| 40. | मूल्यदृष्टीचा कवी : वामनदादा कर्डक<br>- प्रा. संतोष लोंढे | 173 - 175 |
| 41. | भीमशाहीर : वामनदादा कर्डक<br>- ललिता मानसिंग गोपाळ | 176 - 178 |
| 42. | वामनदादा कर्डकांच्या लेखनातील सामाजिकता व मानवता विषयक विचार<br>- राहुल संभाजी पंडित | 179 - 182 |
| 43. | वामनदादा कर्डक यांच्या गीतांमधून झालेले समाजप्रबोधन<br>- प्रा. डॉ. गणपत काशिबा हराळे | 183 - 188 |

| | | |
|---|---|---|
| 44. | वामनदादा कर्डक यांच्या गीतातील सामाजिकता<br>- डॉ. मिलिंद भगवानराव बचुटे / - सुधाकर चौधरी | 189 - 191 |
| 45. | लोककवी वामनदादा कर्डक : व्यक्ती आणि कार्य<br>- डॉ. योगिता देवगिरीकर | 192 - 194 |
| 46. | लोककवी वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील आंबेडकरी तत्वज्ञान<br>- प्रा. मनिषा डोंगरे | 195 - 197 |
| 47. | लोककवी वामनदादा कर्डक यांच्या गीतांतील मानवीमूल्य व संविधानत्मक विचार<br>- प्रा. डॉ. भरत दशरथ खंडागळे | 198 - 201 |
| 48. | वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील सामाजिकता<br>- प्रा. ज्ञानेश्वर कांबळे | 202 – 204 |
| 49. | कवी वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील 'माणूस'<br>- प्रा डॉ डांगे दत्तात्रय महादेव | 205 - 208 |
| 50. | लोककवी वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील आंबेडकरी तत्त्वज्ञान<br>- डॉ. अंजली दशरथ काळे | 209 - 212 |
| 51. | आंबेडकर चळवळीचे गायक वामनदादा कर्डक यांचे समाज प्रबोधनातील योगदान<br>- डॉ सुरेश किशन भदरगे | 213 - 217 |
| 52. | वामनदादा कर्डक यांचे ललित साहित्य<br>- नयन काशीनाथ राणे | 218 - 221 |
| 53. | वामनदादांच्या कवितेतील सामाजिकतेला आंबेडकरी तत्त्वज्ञानाचे अधिष्ठान<br>- प्रा. सारिका शिवाजीराव पासंगे | 222 - 225 |
| 54. | महाकवी वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील आंबेडकरी तत्त्वज्ञान<br>- प्रा.डॉ. शैलजा श्रीधर शिंदे | 226 – 229 |
| 55. | वामनदादांच्या गझलेतील संग्रामशीलता<br>- डॉ. प्रकाश राठोड | 230 – 236 |
| 56. | समतेची क्रांतिगीते गाणारा लोककवी : वामनदादा कर्डक<br>- डॉ. एकनाथ श्रीपती फुटाणे | 237 – 243 |
| 57. | वामनदादा कर्डकांच्या गीतातील सामाजिक पर्यावरण<br>- प्रा. डॉ. कल्पना नारायण गावडे | 244 – 247 |
| 58. | शाहीर वामनदादा कर्डक यांच्या गझलेचा आकृतिबंध<br>- गजानन भुसरे | 248 - 252 |

| | | |
|---|---|---|
| 59. | महागीतकार वामनदादा कर्डक यांच्या गीतातील समग्रता<br>- अविनाश साळवी / प्रा. डॉ. संजीवकुमार पांचाळ | 253 - 255 |
| 60. | लोककवी वामनदादा कर्डक : व्यक्ती आणि कार्य<br>- मनिषा एकनाथ शुद्रे | 256 - 258 |
| 61. | वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील सामाजिकता<br>- प्रा. संदीप परदेशी | 259 - 261 |
| 62. | वामनदादा कर्डक यांच्या लेखनातील वैविध्यता<br>- डॉ. कैलास झाळे | 262 - 264 |
| 63. | लोककवी वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील गीतभीमायन<br>- डॉ. युवराज धबडगे | 265 - 269 |
| 64. | महाकवी वामनदादाचे शैक्षणिक तत्वज्ञान<br>- प्रा. विजय देविदास वाकोडे | 270 - 274 |
| 65. | लोककवी वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील आंबेडकरी तत्त्वज्ञान<br>- अमोल जयदेव वानखेडे | 275 - 277 |
| 66. | आंबेडकरी चळवळीचे क्रान्तिवाहक - वामनदादा कर्डक<br>- डॉ. संतोष बनसोड | 278 - 283 |
| 67. | आंबेडकरी शाहीर : वामनदादा कर्डक<br>- प्रा.सौ. नंदा निवृत्ती मास्कर | 284 - 287 |
| 68. | वामनदादा कर्डक यांच्या गीतातील आशयसौंदर्य व विषयविविधता<br>- प्रा. लक्ष्मी नरहरी पवार | 288 - 290 |
| 69. | लोककवी वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील आंबेडकरवादी तत्वज्ञान<br>- शितल अण्णासाहेब सुसरे | 291 - 294 |
| 70. | लोककवी वामनदादा कर्डक यांच्या कवितेतील सामाजिकता<br>- सतीश जमधाडे | 295 - 297 |
| 71. | लोककवी वामनदादा कर्डक यांची गझल रचना<br>- प्रा.डॉ. रविकांत शिंदे | 298 - 302 |
| 72. | शाहीर वामनदादा कर्डक यांच्या गझलेचा आकृतिबंध<br>- ज्योती स्वामी | 303 - 308 |



# लोककवी वामनदादा कर्डक : व्यक्ती आणि कार्य

- डॉ. देवयानी चव्हाण

(सहयोगी प्राध्यापक)

गो. से. अर्थ - वाणिज्य महाविद्यालय नागपूर

---

सामाजिक समतेचे पुरस्कर्ते, शाहीर, कवी आणि आंबेडकरी चळवळीतील खंदे कार्यकर्ते, लोकसेवक अशी वामनदादांची ओळख. दादांचा जन्म १५ ऑगस्ट १९२२ नाशिक जिल्ह्यातील सिन्नर तालुक्यातील देशवंडी या खेडेगावात गरीब कुटुंबात तबाजी आणि सईबाई यांच्या पोटी झाला. घरची परिस्थिती हलाखीची असल्यामुळे त्यांना शिक्षण घेता आले नाही. परंतु त्यांना प्रतिभा ही जन्मदत्त देणगी लाभल्यामुळे लेखणी वाणी आणि संगीत यांचा सुरेख संगम त्यांच्या जवळ होता. प्रकाशित आणि अप्रकाशित मिळून साधारणतः दहा हजारांच्या आसपास त्यांची गीतरचना आहे त्यांच्या हयातीतच त्यांचे चार काव्यसंग्रह प्रकाशित झाले होते मुलगी मीरा च्या निधनानंतर आईसोबत पोटाची खळगी भरण्याकरिता वामन दादा मुंबईला आले. त्यांनी गिरणी कामगार, कोळशाच्या वखारीत कोळसा उचलणे, चिक्की व आईसफ्रूट विक्री असे अनेक उद्योग केले. नंतर त्यांना टाटा कंपनीत नोकरी मिळाली. मुंबईच्या बी.डी. चाळीत एक माणूस त्याला आलेले पत्र घेऊन दादांकडे आला व म्हणाला मास्तर एवढं पत्र वाचून दाखवा. दादांना पत्र वाचता आले नाही. त्या माणसाच्या मनाची तगमग पाहून संवेदनशील दादांच्या डोळ्यात पाणी आले आणि त्यांनी त्याक्षणी ठरवून टाकले की आपण शिकायचे. त्यांचे अधिकारी देहलवी यांच्याकडून जिद्दीने अक्षर ओळख करून घेतली. पुढे दादांनी डॉ. आंबेडकरांचे विचार महाराष्ट्र मध्य प्रदेश व गुजरात येथे जाऊन सर्वांपर्यंत पोहोचविण्याचा  विडा उचलला. दादा म्हणजे आंबेडकरी विचार, तत्वज्ञान लोकशिक्षणाच्या माध्यमातून सामान्य माणसापर्यंत पोहचविणारे प्रभावशाली लोकशिक्षक होते.त्यांनी तळागाळातील लोकांना जागृत करण्याचे कार्य केले त्यांना साहित्य संस्कृती मंडळाची उत्कृष्ट'कविरत्न', महाराष्ट्र राज्य शासनाचा 'दलित मित्र' पुरस्कार असे सुमारे पंचवीस पुरस्कार मिळाले.

**संशोधन पद्धती :-** प्रस्तुत संशोधन शोधनिबंधासाठी निरीक्षणात्मक व वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा उपयोग करण्यात आला आहे. यात तथ्य संकलनासाठी विविध दुय्यम साधनांचा वापर करण्यात आला असून यात विविध संदर्भ ग्रंथ मासिके व वर्तमानपत्रांचा उपयोग करण्यत आला आहे.

**अध्ययनाचे उद्देश :** वामनदादा कर्डक यांच्या वक्तीमत्वाचा आणि  कार्याचा आढावा घेणे.

**आशय विश्लेषण :** वामनदादा कर्डक यांनी एक लोककवी, समाजसुधाकर आणि समाजसेवक म्हणून कसे कार्य केले, त्यासबधिचे विचार याविषयी पुढीलप्रमाणे आढावा घेता येईल

**वामनदादा कर्डक यांचे लौकीक जीवन आणि कार्य**

नाशिक जिल्ह्यातील सिन्नर तालुक्यातील देशवंडी या गावी १५ ऑगस्ट १९२२ साली या लोकसेवकाचा सईबाई च्या पोटी जन्म झाला. वडिलांचे नाव तबाजी कर्डक आणि आईचे नाव सईबाई. वामन दादांना सदाशिव हा मोठा भाऊ आणि सावित्री ही लहान बहीण. बाकीची भावंडे लहान वयातच मरण पावली. वामनदादाचे बालपण बिकट परीस्थितीत, गरिबीत, कष्ट करण्यात गेले. पाच सहा वर्षाचे असताना पासूनच गावातील तमासगीरांची गाणी त्यांच्या कानावर पडली या गाण्यांचा परिणाम असा झाला की त्यांचे मन लहान वयातच त्यात रमू लागले. त्यांच्या कानांना आणि मनाला त्या गाण्यांनीमोहिनी घातली. वामनदादाच्या आवाजात गोडवा असल्यामुळे तमाशा मध्ये गाण्याच्या शेवटी झील धरण्याचे काम ते करीत. दादांचे बालपण ताल आणि स्वरांमध्ये खेळत होते. सात आठ वर्षाचे असतानाच गळ्यात संबळ घेऊन मोहल्ल्यात गायन करीत फिरत असे. वामनदादा दहा-अकरा वर्षाचे असताना शाहीर भेगडे यांचा नाशिक सत्याग्रहाचा पोवाडा ऐकून त्यांचे संवेदनशील मन द्रवले आणि त्याचा परिणाम असा झाला की त्यांनी गीत लेखनाला सुरुवात केली. १९४३पासून खऱ्या अर्थाने गीत लेखनाला प्रारंभ झाला. अठराविश्व दारिद्र्य आणि कुटुंबात निर्माण झालेल्या अडचणी यामुळे दादा दुःखाने व्यथित झाले. घरी पाच सहा गुरे होती तीच चरायला रानात घेऊन जाण्याचे काम ते करू लागले. घरी अठरा एकर जमीन होती, त्यावर कुटुंब चालत असे पण त्यांच्या बहिणीने ती जमीन विकून टाकली. घरच्या माणसांना टेंभुर्णीच्या पानांचे लहान पुडे बांधून विकण्याचे काम करावे लागले. वडील आणि काका गाई-बैलांचा व्यापार करायचे. सर्वांच्या वाट्याला कष्ट येत असूनही उपासमार काही सुटत नव्हती. याच काळात वामन दादांना आखाड्यात जाण्याचा छंद लागलागावामध्ये जत्रा भरत असे त्यात वामन दादा कुस्त्या खेळत. गावात शाळा नसल्याने शिक्षणाशी नाळ जुळली नाही. आई, बहीण आणि वामनदादा असे तिघेजण मुंबईला आले. आई आणि बहिणीसोबत लाकडी कोळशाच्या वखारीत कोळसा वेचण्याचे काम त्यांनी केले. पुढे ते सायन मधून शिवडीला पत्र्याच्या चाळीत राहायला गेले. गिरणीत आसन खात्यात काम सुरू झाले, पण गिरणीच बंद पडल्यामुळे मातीकाम आणि सिमेंट कॉंक्रिटचे काम करावे लागले. या काळातच आईसफ्रूट विकणे, चिक्की विकणे आणि आईबरोबर खडी फोडणे ही कामे त्यांनी केली. पुढे टाटा ऑइल मिलमध्ये नोकरी लागली, याच काळात अनुसया नावाच्या तरुणीशी त्यांचे लग्न झाले संसार सुरू झाला पण काही काळातच पत्नी अनुसया सोडून गेली आणि झालेले अपत्यही देवाघरी गेले. याच काळात वामनदादा समता सैनिक दलात भरती झाले तिथे लेझीमचे, काठीचे शिक्षण घेतले. चाळीतील मुलांना लेझीमचे शिक्षण देऊ लागले. सर्वजण त्यांना मास्तर म्हणायचे. एका अशिक्षित गृहस्थाने त्यांना आलेले पत्र वाचून घेण्यासाठी त्यांच्याकडे आणले, पण त्यांना ते पत्र वाचता आले नाही. याचे त्यांना दुःख झाले. देहलवी साहेबांच्या प्रेरणेने वामन दादा लिहा वाचायला शिकले आणि मग लेखन वाचनाने वेग पकडला. टेनिस, क्रिकेट आणि व्यायाम याकडेही त्यांनी विशेष लक्ष घातले. मराठी आणि हिंदी पुस्तकांचे खूप वाचन केले. चित्रपट कथाकार आणि नट व्हावे असे त्यांना वाटायला लागले. या काळातच मिनर्व्हा कंपनीचे सल्लागार झाले आणि त्यासोबतच रणजीत आणि कारदार स्टुडिओत कामाला ते जाऊ लागले. १९४३ साली राणीच्या बागेत विचारमग्न असताना हिंदी गीताचे विडंबन केले आणि वामन दादांना एक नवे जगणे सापडले आणि पुढे गीतलेखन आणि गायन ही त्यांची जीवनशैली बनली.

वामनदादांच्या संवेदनशील मनाने एकदा समुद्रात झालेला बॉम्बस्फोट पाहिला जे जे हॉस्पिटल च्या आवारात जळून मेलेल्या शेकडो लोकांची प्रेते बघितली आणि नोकरी कधीही करायची नाही हा निर्णय त्या क्षणी घेऊन टाकला आणि या

आपल्या लेखनाचा आणि गायनाचा विषय निश्चित केला.
प्रतिभाशाली गीतकाराने बाबासाहेब आंबेडकरांची चळवळ हाच आपल्या लेखनाचा आणि गायनाचा विषय निश्चित केला वयाच्या चाळीसाव्या वर्षी दादांनी दुसरे लग्न शांता
१९४३ ते आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत ते ह्याच ध्येयाने प्रेरित राहिले. वयाच्या चाळीसाव्या वर्षी दादांनी दुसरे लग्न शांता
सोबत केले. त्यानंतर त्यांना टी बी. चा आजार झाला. त्यातून ते बरे झाले. त्यानंतर त्यांनी लेखनाचा आणि गायनाचा सपाटाच
सुरू केला. त्यांच्या गायनाला आणि गीतांना इतरांपेक्षा निराळे सौंदर्य आणि सामर्थ्य प्राप्त झाले बाबासाहेब आंबेडकरांसोबत
भेटी होत असल्यामुळे त्यांच्याकडून प्रेरणा मिळत गेली आणि दादा लोकप्रिय होऊ लागले. सन्मान मिळत गेले. मुनसीपाटींच्या
दिव्या खाली बसून हजारो गाणी लिहिली. 'सांगा या वेडीला माझ्या गुलछडीला' हे गीत 'सांगते ऐका' या चित्रपटासाठी
सुप्रसिद्ध कृष्णा शिंदे यांनी गायले. त्याचे मानधन अनंत माने यांनी पन्नास रुपये दिले. 'चल ग हरणे तुरू तुरू' हे गीत त्यांनी
'पंचारती' या चित्रपटासाठी लिहिले. संगीतकार वसंत पवार हे गीत गुणगुणताना नाचायचे पुढे मात्र दादांनी चित्रपटांचा नाद
सोडला. दादांची अनेक गाणी ध्वनिमुद्रित झाली

वामनदादा म्हणजे आंबेडकरी गीताचे महामेरू. गहन तत्वज्ञान साध्या शब्दात सांगणारे अवघे जीवन समाजासाठी
वाहिलेले लोकविलक्षण असे कलाकार होते. आंबेडकरी विचार जनमानसात रुजविणारे अनेक आंबेडकरी गीतकार होऊन गेले
बाबासाहेबांना आपला ऊर्जास्रोत मानून बाबासाहेबांचा विचार पोहोचविणारे अनेक असंख्य ज्ञात-अज्ञात कलावंताचे कार्य
मोठे आहेत. बाबासाहेबांच्या मानवमुक्तीच्या लढ्यातील विविध स्तरातील प्रतिभावंत कलावंतांची संख्याही मोठी आहे मात्र
त्यामध्ये लोकशाहीर वामनदादा कर्डक यांचे कार्य त्यांच्यापेक्षा फार निराळे आहेदहा हजाराहून अधिक गीते रचली आहेत.
लोकशाहीर वामनदादांनी आंबेडकरांचे विचार आपल्या ओजस्वी वाणीतून आणि समर्थ लिखाणातून महाराष्ट्राच्या घराघरात
खेड्यापाड्यात पोहोचविण्याचे काम केले.बुद्ध, फुले, आंबेडकर यांचा विचार वामनदादाचा श्वास होता ऊर्जा केंद्र होते. हे
विचार प्रभावीपणे प्रसारित करत जीवनाच्या शेवटपर्यंत समाजजागृतीचे कार्य करीत राहिले, त्यामुळे समाज जागृत होत राहिला.
समाजाला योग्य दिशा मिळाली. वामनदादा आंबेडकरी सम्यक क्रांतीला प्रकाशमान करणारे तेजस्वी गीत होते गाण हे
आंबेडकरी विचार जनमानसात पोहचविण्यासाठी प्रभावशाली शक्ती आहे.संपर्काचे परिणामकारक माध्यम आहे, म्हणून त्यांनी
ह्या माध्यमांचा वापर तळागळातील लोकांना जागृत करण्यासाठी केला त्यांनी आपल्या प्रतिभेच्या अभिव्यक्तीसाठी शब्द सूर
आणि स्वर यांचा एखाद्या क्षेपणास्त्रासारखा वापर समाजात चेतना निर्माण करण्यासाठी केला. सामाजिक बंधुता, धर्मनिरपेक्षता
व सामाजिक एकीकरण हे तत्व समाजामध्ये गीतांच्या द्वारे रुजवण्याचे कार्य दादांनी केले

आज त्यांच्या गीतांचा नवप्रवाह निर्माण झाल्याचे दिसून येते गेल्या अनेक दशकांपासून वामनदादा सारखे त्यागी
व्यक्तिमत्व या देशांमध्ये झालेले दिसत नाही. त्यांच्या गीतात एक ऊर्जा आहे, जी ऊर्जा प्रत्येक माणसाच्या जीवनात प्रकाशाची
ज्योत निर्माण करते.समाजाच्या अनेक प्रश्नांवर रूढी-परंपरांवर गीताद्वारे प्रहार केले सामाजिक समता, बंधुता, एकता, प्रस्थापित
करण्यासाठी कार्य केले.

वामनदादा कर्डक यांनी ८२ वर्षाच्या जीवन प्रवासामध्ये समाजाला एकीकरणाची, बंधुभावाची व सामाजिक
सुरक्षेची भावना प्रस्थापित करण्यासाठी गीतांद्वारे सेवा दिली सेवेबद्दल त्यांना अनेक पुरस्कार मिळाले दिल्लीची डॉ.
बाबासाहेब आंबेडकर फेलोशिप, महाराष्ट्र राज्य शासनाचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर दलित मित्र पुरस्कार, औरंगाबाद येथे
भव्य पहिला नागरी पुरस्कार, हिंगोली जिल्ह्यातील वसमत या गावी डॉ. संजय मोहड यांनी आयोजित केलेल्या 'स्वराहर्त संगीत
संगिती' या कार्यक्रमांमध्ये नागरी सत्कार, मुंबईच्या बुद्ध कलावंत संगीत अकादमीचा भिमस्तुती पुरस्कार असे बरेच पुरस्कार
दादांना मिळाले. वामनदादाच्या शेवटच्या क्षणाला अनेक लोकांनी त्यांच्याकडे पाठ फिरविली पण दादांनी आपली सेवा हे
सोडले नाही. त्यांच्या सेवेचे ऋण आपण विसरता कामा नये. आज वामनदादा हयात नसले तरी त्यांच्या गीतांमधून ते..

माणसा तू आज भीमाचे डोळे घे
प्रकाशणारे मोठे मोठे गोळे घे
ज्या डोळ्यांनी वाट आम्हाला दाविली,
पोरं आमची त्या वाटेला लाविली तेजाचे गोड मधाचे पोळे घे.

वामनदादांनी फक्त बाबासाहेब आंबेडकरांची गाणी म्हटलेली आहे असे नाही तर समाजातील जे प्रश्न होते त्या सगळ्या प्रश्नांना त्यांनी वाचा फोडली स्त्रीभ्रूणहत्या, स्त्री सशक्तिकरण, लोकगीत, पोवाडे, चित्रपटगीत, देशभक्तीपर गीत यासारख्या अनेक गीत प्रकारांवर वामन दादांनी गीतरचना करून भारत देशातील समाजव्यवस्थेला एक दिशा देण्याचे कार्य केले. समाजामध्ये जागृती करून अज्ञान दूर करण्याचा प्रयत्न केला. वामन दादा हे एक पाईक आहे असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही.

**समारोप**

वामनदादा म्हणजे जिवंत चळवळ. समाज जीवनाची अस्सल मुद्रा उमटविणारे सुवर्ण मोहर आहे. तेजस्वी गीतातून वामन दादांनी सामाजिक जाणीवा व्यक्त केल्या. त्या गीतांचे स्वरूप मानवमुक्ती आहे स्त्री-पुरुष असा कुठलाच भेद नसून तो माणूस आहे एवढाच विचार अनेक गीतातून मांडला खेड्यापाड्यातल्या दारिद्र्याने पिडलेल्या अशिक्षित लोक समूहाचा विचार दादांनी आपल्या गीतातून मांडला वामन दादांच्या गीतांची रचना ही आशय आणि विषयांच्या विपुल रचनेत प्रासंगिक देशभक्तीपर, सामाजिक वास्तव, विषमता आणि शोषितांची हलाखीची परिस्थिती व्यक्त करणारी आहे. वामनदादांचे लेखन मूल्यांच्या दृष्टीने प्रेरक तसेच सामाजिक दृष्टीने मौलिक ठरलेले आहेत. वामन दादा यांच्या एकूणच गीतांमधून सामान्य माणसाला बाबासाहेबांचा विचार सोप्या भाषेत समजून देत त्यांच्यातनवसंजीवनी, चेतना निर्माण करणे हाच होता आणि हेच दादांचे यश आहे.

**संदर्भ ग्रंथ**


१. महाकवी वामनदादा कर्डक गाणं शतकानुशतकांच खंड१, संपादक प्रा. प्रशांत मोरे/ सिद्धार्थ मोरे.
२. एक कवीचे जीवनगाणे, लेखक -बबन लोंढे.
३. आंबेडकरी प्रतिभेचा महाकवी: वामनदादा कर्डक, लेखक डॉ. अशोक जोंधळे, डॉ. शत्रुघ्न जाधव.
४. महान लोककवी वामनदादा कर्डक, संपादक -आचार्य सूर्यकांत भगत
५. आंबेडकरवादी महागीतकार वामनदादा कर्डक, लेखक डॉ. यशवंत मनोहर.


* * * * *

ISSN 2231-573X
UGC Care Listed Journal
MAH MAR 34737/13/1/2009-TC



माणसा इथे मी तुझे गीत गावे
असे गीत गावे तुझे हीत व्हावे ।।धृ।।

असे गोड नाते तुझ्याशी जडावे
तुझ्या संकटाशी इथे मी लढावे ।।१।।

तुझ्याच भुकेचे कोडे उलगडावे
तुझे दु:ख सारे गळूनी पडावे ।।२।।

एकाने हसावे लाखाने रडावे
जुने सारे सारे असे ना उरावे ।।३।।

इथे सारे सारे नवे पेरताना
वामनापरी मी तुझे हात व्हावे ।।४।।

- लोककवी वामनदादा कर्डक

हा अंक मालक, मुद्रक, प्रकाशक, शिवाजी हुसे यांनी रूद्रायणी ऑफसेट, सिडको, औरंगाबाद येथे छापून 'शिवार', श्रीराम कॉलनी, हिवरखेडा रोड, कन्नड, ता. कन्नड जि. औरंगाबाद येथे प्रसिद्ध केला.
E-mail : editortiphan2009@gmail.com